


ईद-ए-मिलाद निमित्ताने सर्व मुस्लिम बांधवांना हार्दिक शुभेच्छा!

# सेवाशक्ती टाईम्स

शिक्षक दिन निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!



https://www.sewashaktitimes.com | मुख्य संपादक - अंकोश जानु राठोड - 9011509831 | कार्यकारी संपादक - गजानन सरकटे - 8605433822 | E-mail: ankoshrathod25@gmail.com

बुलडाणा • वर्ष:- 3 रे • अंक:- १९० • पाने:- ४ • किंमत:- २ रुपये • RNI:- MAHMAR/२०२२/८७८८४ • शुक्रवार ०५ सप्टेंबर २०२५





## 'काँग्रेसच्या काळात टॉफीवरही २१ टक्के टॅक्स तर घरं घेणंही...'

## जीएसटी बदलावर पंतप्रधान नरेंद्र मोदींची पहिली प्रतिक्रिया

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**

मुंबई : अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली नुकतंच जीएसटी परिषदेच्या 56 वी बैठक पार पडली. या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यात आता 12 टक्के आणि 28 टक्के हा जीएसटी स्लॅब रद्द करण्यात आले आहेत. त्याऐवजी आता फक्त 5 टक्के आणि 18 टक्के असे दोनच स्लॅब ठेवण्यात आले आहेत. या निर्णयावर आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या नव्या सुधारणांना जीएसटी 2.0 असे संबोधले आहे. यामुळे देशातील मध्यमवर्गीय कुटुंबांचे जीवनमान अधिक सोपे होईल, असा विश्वास मोदींनी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या शिक्षकांशी संवाद साधला. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, स्वातंत्र्यानंतरचा हा सर्वात मोठा आणि महत्त्वाचा आर्थिक सुधार आहे. आता पनीर, पिझ्झा ब्रेड, रोटी आणि पराठा यांसारख्या वस्तू आता शून्य जीएसटी स्लॅबमध्ये आला आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. आता जीएसटीचे फक्त दोनच दर असतील. 5 टक्के आणि 18 टक्के हे नवीन दर 22 सप्टेंबर पासून म्हणजेच नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासून लागू होणार आहेत, असे नरेंद्र मोदी म्हणाले.पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, काँग्रेस सरकारने तुमचा मासिक खर्च कसा वाढवला हे कोणीही विसरू शकत नाही. ते लहान मुलांच्या टॉफीवरही 21% कर लावत होते. "जर मोदींनी असे केले असते, तर त्यांनी माझे केस उपटले असते."मागच्या सरकारांद्वारे वस्तूंवर मोठ्या प्रमाणावर कर आकारला जात होता. मी सत्तेत येण्यापूर्वी काँग्रेसचे सरकार होते, ते स्वयंपाक घरातील वस्तू, शेतमाल असेल की औषधे यावर वेगवेगळे कर आकारत होते. आज जर तो काळ असता तर तुम्हाला १० रुपयांच्या वस्तूवर २०-२५ टक्के कर भरावा लागला असता. आमच्या सरकारने सामान्यांच्या आयुष्यात जास्तीत जास्त बचत करण्या साठी बदल केले आहेत, त्यांचे आयुष्य चांगले बनविले आहे, असे मोदी म्हणाले. २२ सप्टेंबर पासून हे बदल लागू होतील. २०१७ मध्ये जीएसटी लागू झाल्यानंतरचा हा सर्वात मोठा बदल आहे. पूर्वी ज्या वस्तू उच्च कर स्लॅबमध्ये होत्या त्या आता बहुतेक ५% आणि १८% च्या स्लॅबमध्ये येतील. यामुळे हॉटेल, प्रवास, आवश्यक वस्तू या सर्वच आवाक्यात येणार आहेत. देशातील तरुणांना फिटनेस क्षेत्रातील बदलांचा फायदा होईल. जिम, सलून, योगा. या सेवांवरील कर कमी करण्यात आला आहे, याचा अर्थ आपले तरुण तंदुरुस्त राहतील, असे मोदी म्हणाले.

### सर्वसामान्यांना घर बांधणेही कठीण!

"काँग्रेसच्या काळात टॉफीवरही टॅक्स होता. काँग्रेसच्या काळात १०० रुपयांवर २५ रुपये टॅक्स द्यावा लागत होता. काँग्रेस टॉफीवर २१ टक्के टॅक्स आकारत होती. सायकलवर १८ टक्के कर लागत होता. काँग्रेसच्या काळात सर्वसामान्यांना घर बांधणेही कठीण झाले होते. 2014 मध्ये त्यांचे सरकार येण्यापूर्वी स्वयंपाकघरातील वस्तू, शेतीची उपकरणे, औषधे आणि अगदी जीवन विम्यावरही काँग्रेस सरकार विविध प्रकारचे कर आकारत असे. 100 रुपयांच्या वस्तूवर २०-२५ रुपये कर लागत होता. पण आमच्या सरकारचा उद्देश सामान्य लोकांच्या जीवनात बचत व्हावी आणि त्यांचे जीवनमान सुधारावे हा आहे", असे नरेंद्र मोदी म्हणाले.

### मोठ्या आर्थिक सुधारणांपैकी एक!

"भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी सुधारणांचा हा सिलसिला थांबणार नाही. आत्मनिर्भरता ही फक्त घोषणा नाही, तर त्या दिशेने ठोस प्रयत्न होत आहेत. जीएसटी २.0 हा देशासाठी सपोर्ट आणि वाढीचा डबल डोस आहे. या नवीन सुधारणांमुळे देशातील प्रत्येक कुटुंबाला मोठा फायदा होईल. यंदाची धनत्रयोदशी अधिक आनंददायी असेल, कारण अनेक वस्तूंवरील कर आता खूप कमी झाला आहे. 8 वर्षांपूर्वी जीएसटी लागू झाला, तेव्हा अनेक दशकांचे स्वप्न साकार झाले. हा स्वतंत्र भारताच्या सर्वात मोठ्या आर्थिक सुधारणांपैकी एक होता", असेही नरेंद्र मोदींनी म्हटले.

### दशकांचे स्वप्न पूर्ण!

₹दशकांपासूनचे स्वप्न साकार झाले₹ असे पंतप्रधान मोदी म्हणाले. 8 वर्षांपूर्वी जेव्हा जीएसटी लागू झाला, तेव्हा अनेक दशकांचे स्वप्न साकार झाले. ही चर्चा मोदी पंतप्रधान झाल्यानंतर सुरु झाली नाही. या चर्चा यापूर्वीही होत होत्या, पण कधीही काही काम झाले नाही. जीएसटी हे स्वतंत्र भारताच्या सर्वात मोठ्या आर्थिक सुधारणांपैकी एक होते. ₹खरं तर, हे सुधार देशवासियांसाठी दुहेरी लाभाचे आहेत. एकीकडे देशातील सामान्य माणसांचे पैसे वाचतील, तर दुसरीकडे देशाची अर्थव्यवस्था मजबूत होईल."

### अर्थव्यवस्थेत 5 रत्ने जोडली गेली!

जीएसटीमध्ये जे काही बदल करण्यात आले आहेत, त्या बदलांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत 5 रत्ने जोडली जातील, असेही मोदी म्हणाले. जीएसटी प्रणाली अधिक सोपी होईल, भारतातील नागरिकांचे जीवनमान सुधारेल, उपभोग आणि विकास दरात वाढ होईल, व्यवसाय करणे सुलभ होईल, गुंतवणूक आणि रोजगाराला प्रोत्साहन मिळेल आणि एका विकसित भारतासाठी सहकारी संघवाद मजबूत होईल, असे त्यांनी सांगितले. पंतप्रधान मोदी म्हणाले, ₹युवांसाठी आणखी एक फायदा फिटनेस क्षेत्रात होणार आहे. जिम, सलून, योग यांसारख्या सेवांवर जीएसटी कमी करण्यात आला आहे, ज्याचा अर्थ आपले युवा तंदुरुस्त राहण्यासोबतच सक्रियही राहतील."

## बंजारा समाजाची अमरगड येथे बैठक

## ७ सप्टेंबरला बांधवांना एकत्र येण्याचे आवाहन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**




जिंतूर : मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा ऐतिहासिक हैदराबाद गॅझेटची चर्चा रंगू लागली आहे. निजामशाही काळात तत्कालीन मराठवा ड्यातील पाच जिल्ह्यां मध्ये (सध्याच्या आठ जिल्ह्यां मध्ये) बंजारा / लंबाडी समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात स्थान असल्याचा ठोस उल्लेख आहे. या दस्तावेजांचा आधार घेत न्याय मिळविण्या साठी आगामी काळात बंजारा समाजाने लढ्याची तयारी केली पाहिजे, असा ठाम निर्धार समाज बांधवां मध्ये दिसून येत आहे. याच अनुषंगाने दि. ७ सप्टेंबर २०२५ रोजी, रविवार सकाळी ११ वाजता क्षेत्र अमरगड, ता. जिंतूर येथे समाजाची महत्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. समाजाच्या भवितव्याचा निर्णय ठरणारी ही बैठक असल्याने जास्तीत जास्त बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. समाजाच्या अस्ति त्वाशी निगडित असलेल्या या आंदोलना साठी पूर्वतयारी करण्याचा निर्धार या बैठकीत केला जाणार असून, भावी लढ्या साठी दिशा व आराखडा ठरणार आहे. त्यामुळे ही बैठक अत्यंत महत्वाची ठरणार असल्याचे स्पष्ट होत आहे. समाजातील सर्व वयो गटातील बांधव, महिला, युवक तसेच ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन या बैठकीला यशस्वी करावे, असे स्पष्ट आवाहन करण्यात आले आहे. समाजातील प्रत्येक गाव वाडी-वस्तीवर पोहोचवून सर्वांनी अमरगड येथे उपस्थित रहावे, असे आवाहन जिंतूर तालु क्यातील समस्त बंजारा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

## श्री क्षेत्र सिमूर गव्हाण येथे जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळ्याचे आयोजन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अहमद अन्सारी.**



पाथरी : जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत जगद्गुरु रामा नंदाचार्य नरेंद्राचार्यजी, जगद्गुरु रामानंदाचार्य दक्षिण पीठ नाणीज धाम यांच्या समस्या मार्ग दर्शन व दर्शन सोहळयाचे आयोजन दिनांक ९ व १० सप्टेंबर २०२५ रोजी ज. न. म. संस्थान, उपपीठ मराठवाडा, श्रीक्षेत्र सिमूर गव्हाण ता. पाथरी जि. परभणी येथे सकाळी ९ वाजता आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मराठवाडा पीठ प्रमुख श्री. जयप्रकाश लोणारी, पीठ सहप्रमुख श्री. विजय देशपांडे पीठ व्यवस्थापक श्री सुरेश मोरे यांनी एका प्रसिध्दी प्रत्रकाद्वारे दिली आहे. कार्य क्रमाच्या अनुषंगाने संस्थानाच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात जसे की, ग्रामस्वच्छता अभियान, शैक्षणिक उपक्रमां तर्गत इंग्रजी माध्यमांची मोफत शाळा, मोफत वेदपाठ शाळा, रक्तदान शिबिर, वैद्यकीय उपक्रमांतर्गत मोफत दवाखाना, आज पर्यंत 137 जणांनी मरणोत्तर देहदान केले, 58 जणांनी मरणोत्तर अवयव दान, मोफत रुग्णवाहिका सेवा - महाराष्ट्रात विविध महामार्गावर 53 रुग्णवाहिका 24 तास अखंडपणे अपघात ग्रस्तांच्या सेवेत कार्यरत आहेत. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे पुनर्वसन, महिला सक्षमीकरण अंतर्गत मोफत शिलाई यंत्र वाटप, मोफत घरघंटी वाटप, आपत्कालीन मदत उपक्रम, कायदेविषयक साक्षरता शिबिरे, रक्तदान शिबिर या वर्षी जानेवारी मध्ये घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून अवघ्या १५ दिवसांमध्ये १३६ २७० रक्त कुपिकांचे संकलन करण्यात आले, ब्लड इन नीड आदी उपक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमासाठी पिठ अंतर्गत जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक भक्त, साधक, शिष्य, हितचिंतक यांनी दि. ९ व १० सप्टेंबर २०२५ रोजी जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रवचन व दर्शन सोहळ्याचा लाभ घ्यावा. या कार्यक्रमात दिनांक ९ सप्टेंबर ला उपासक दीक्षा व दि. १० सप्टेंबर रोजी साधक दीक्षा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी जास्तीत जास्त भाविकांनी उपासक दीक्षा व उपासक यांनी साधक दीक्षा घेण्यासाठी नोंदणी करावी. या समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळया साठी येणाऱ्या भाविकांसाठी कार्यक्रमाच्या दोनही दिवस महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी या महन्मंगल समयी आपण सर्वांनी सहकुटुंब, सहपरिवार, आप्तइष्ट मित्रांसह उपस्थित राहून परमश्रद्धेय जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रवचन व दर्शनाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन मराठवाडा पीठ समिती व जिल्हा सेवा समितीच्या पदाधिकारी यांनी केले आहे.

## जिल्हा परिषदांच्या निवडणुका डिसेंबर अखेर संपतील, अजित पवार यांचे सुतोवाच

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**



पुणे : राज्यात जिल्हा परिषदांच्या निवडणुका डिसेंबरअखेर पूर्ण होऊन जानेवारीत नवीन कार्यकारिणी स्थापन होईल. मात्र, अन्य काही निवडणुका जानेवारीतही होतील, असे सूतोवाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. गट व गणांच्या प्रभाग रचनांवर हरकती सूचनांवर सुनावणी पूर्ण होऊन अंतिम प्रभाग रचना तयार झाली आहे. आता आरक्षण कसे राहील, यासाठी सोडत निघेल, याबाबतचा अधिकार राज्य निवडणूक आयोगाचा आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार बाबाजी काळे, शंकर मांडेकर, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुनील मापारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत खरात, भूषण जोशी उपस्थित होते.राज्यात येत्या १७ सप्टेंबर पासून ३१ डिसेंबरपर्यंत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या अभियानाद्वारे प्रत्येक गावाने स्वतःचा विकास आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. या अभियानासाठी तब्बल २४५.२० कोटी रुपयांचे १ हजार ९०२ पुरस्कार देण्यात येणार आहेत. त्यात स्वच्छता, शाश्वत विकास, हरित उपक्रम, महिला व बालकांच्या विकासासाठी घेतलेला पुढाकार आदी निकषांवर गावांचे मूल्यमापन होईल, असेही त्यांनी सांगितले. सरकार लोकांच्या दारी पोहोचले पाहिजे. लोकशाही तळागाळात रुजली पाहिजे, असे दिवंगत मुख्य मंत्री यशवंतराव चव्हाण सांगत होते. ग्रामपंचायती केवळ स्थानिक स्वराज्य संस्था नसून त्या लोकशाहीच्या शाळा आहेत. याठिकाणीच त्याबाबत निर्णय घेतले जातात. विकासमार्ग आखला जातो. या अभियानातून राज्याचा विकास साधण्याचे प्रयत्न असल्याचेही पवार म्हणाले.

### काय म्हणाले अजित पवार?

**"जिल्हा परिषदांच्या निवडणुका डिसेंबरअखेर पूर्ण होऊन जानेवारीत नवीन कार्यकारिणी अस्तित्वात येईल. त्यासाठी या अभियानाच्या माध्यमातून चांगले काम करता येईल. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये विश्वासाचे वातावरण तयार होईल. तसेच निवडून येण्यासही याचा फायदा होईल. त्यासाठी काहीही करा मेहनत घेतली, कष्ट केले, सकाळपासून कामाला लागल्यास १०० टक्के यश नक्कीच मिळेल. या निवडणुका २०२२ मध्ये होणे अपेक्षित होते. मात्र, सर्व घटकांना आरक्षण मिळावे, यासाठी त्याला विलंब झाला. आता सर्वांनी कामाला लागावे." राज्य सरकारने यंदा जिल्हा वार्षिक नियोजनासाठी तब्बल २२ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून, त्यातील मोठा हिस्सा जिल्हा परिषदेमार्फत थेट गावपातळीपर्यंत पोहोचणार आहे. ग्रामपंचायतींनी हा निधी पारदर्शक व सुयोग्य पद्धतीने वापरून गावांचा सर्वांगीण विकास साधावा. भारताचा आत्मा खेड्यांत आहे. खेडी समृद्ध झाली तर देश आपोआप समृद्ध होईल, असे प्रतिपादनही त्यांनी यावेळी केले.राज्यात येत्या १७ सप्टेंबरपासून ३१ डिसेंबरपर्यंत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या अभियानाद्वारे प्रत्येक गावाने स्वतःचा विकास आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. या अभियानासाठी तब्बल २४५.२० कोटी रुपयांचे १ हजार ९०२ पुरस्कार देण्यात येणार आहेत. त्यात स्वच्छता, शाश्वत विकास, हरित उपक्रम, महिला व बालकांच्या विकासासाठी घेतलेला पुढाकार आदी निकषांवर गावांचे मूल्यमापन होईल, असेही त्यांनी सांगितले.**

# मराठा आरक्षणाचा जल्लोष गोमातेला गुळ चारून पूजा करून जल्लोष साजरा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अहमद अन्सारी.**



परभणी : वीर वारकरी सेवा संघ - राष्ट्रजन फाउंडेशन परभणी - गौरक्षक सेना च्या वतीने मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावं तसेच मराठा समाज संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या प्रत्येक वेळेस च्या उपोषणाला व आरक्षणाच्या संदर्भात मागण्याला पाठिंबा देण्यात आला होता मागील अनेक वर्षापासून मराठा सेवक गोरक्षक नितीन जाधव राजे गोगलगावकर यांनी प्रत्येक आंदोलनामध्ये प्रत्येक मोर्चा असो मराठा समाजासाठी कोणताही 2014 पासून मराठा समाजाला आरक्षण मिळावं निवेदन विविध लोक प्रतिनिधींना पाठपुरवठा मराठा आरक्षणाच्या संदर्भात विविधतेने जागृती समाज प्रबोधनाच्या माध्यमातून त्याच्या मागण्या करत होतो मराठा समाजाला कुणबी मधून आरक्षण मिळावं यासाठी मोठा आंदोलन करणारे मराठा समाजाचे संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांनी 29 ऑगस्ट पासून आझाद मैदान मुंबई येथे आंदोलनात करून मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण समाजा च्या आरक्षण चा जीआर घेतल्या शिवाय आंदोलनच सोडला नाही त्या आंदोलनात मागण्या खालील प्रमाणे हैदराबाद गॅझेटियरची तात्काळ अंमल बजावणी, सातारा गॅझेटियर च्या अंमलबजावणीचा निर्णय कायदेशीर बाबी तपासून एक महिन्यात घेतला जाणार, 58 लाख कुणबी नोंदी ग्राम पंचायतच्या रेकॉर्डवर लावणार, मराठा समाजात बलिदान दिले त्यांच्या कुटुंबाला एक आठवड्यात आर्थिक मदत दिली जाणार, मराठा आंदोलनाकावर केसेस एक महिन्यात मागे घेणार, मराठा आंदोलकांच्या वाहनावर झालेल्या दंड माफ केले जाणार अशा अनेक मागण्याचा जीआर राज्य सरकारने व मनोज दादा पाटील यांच्या मागण्या पूर्ण राज्य सरकारने केल्याबद्दल त्या यशा बद्दल राज्य सरकारचे स्वागत अभिनंदन व आभार त्याचा जल्लोष म्हणून राजमाता म्हणजे गोमाता गोमातेमध्ये 33 कोटी देवता आहे गणपती उत्सव चालू आणि महालक्ष्मी चा विसर्जनाचा दिवस हाच खरा मराठा आरक्षणाचा इतिहास घडला याचा जल्लोष म्हणून गोमातेची गाय वासराची पूजा व गुळ चारून आनंद उत्सव साजरा करण्यात आला याप्रसंगी राष्ट्रजन फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष मराठा सेवक नितीन जाधव गोगलगावकर उज्वल भविष्य साठी शिक्षणासाठी बालकलाकार रुद्राक्ष आवटे रितेश पाटील यांच्यासह मित्रपरिवार उपस्थित होता एक मराठा लाख मराठा कोटी मराठा जय कुणबी ओबीसी मराठा जय श्रीमंत लखुजी राजे महाराज जय शहाजी राजे महाराज जिजाऊ जय शिवराय जय जय संभाजी महाराज जय गोमाता राम कृष्ण हरी घोषणा देऊन जल्लोष वार्ड क्रमांक 15 मध्ये करण्यात आला अशी माहिती वीर वारकरी सेवा संघ महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष मराठा सेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार द्वारे माहिती दिली

# चिखला गावाचा नावलौकिक उजळवणारा एकनाथ वाघ

## थेट हॉवर्ड विद्यापीठात प्रवेश मिळवणारा ग्रामीण महाराष्ट्राचा सुपुत्र

**सेवाशक्ती टाईम्स.**
**श्रीकृष्ण पंधे.**





बिबी : लोणार तालुक्यातील चिखला गावातील एकनाथ भगवान वाघ यांनी अमेरिकेतील जागतिक कीर्तीच्या हॉवर्ड विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळवला असून, त्यांच्या या अभूतपूर्व यशामुळे परिसरात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.या ऐतिहासिक यशाचा गौरव करण्यासाठी बिबी येथील वसंतराव नाईक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात विशेष सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम रामकृष्ण शिक्षण प्रसारक संस्था (हनवत खेड), बिबी यांच्या वतीने पार पडला.संस्थेचे सचिव अभय जगाराव चव्हाण व संचालिका मायाताई अभय चव्हाण यांच्या हस्ते एकनाथ वाघ यांचा शाल, श्रीफळ, हार व रु. २१,०००/- रोख देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर व विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. अभय दादा चव्हाण यांचे मनोगत :ग्रामीण भागातील एका विद्यार्थ्याने थेट हॉवर्ड सारख्या जागतिक विद्यापीठात प्रवेश मिळवणं हे केवळ चिखला गावा साठीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रा साठी अभिमानास्पद आहे. हे यश सर्वांना प्रेरणा देणारे आहे. एकनाथ वाघ हे आमच्या संस्थेच्या कै. जगरावजी चव्हाण यांच्या स्मृति दिनानिमित्त सुरू होणाऱ्या 'विशेष शिष्यवृत्ती योजने'चे पहिले मानकरी आहेत. दरवर्षी रु. १,११,०००/- इतकी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. एकनाथ वाघ यांचा भावनिक शैक्षणिक प्रवास :मी एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलो. आर्थिक अडचणी होत्या, पण शिक्षणाची आवड, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा आशीर्वाद यामुळे मी कधीच थांबलो नाही. गावातून जिल्हा, जिल्ह्यातून राज्य आणि आता थेट अमेरिका - हा प्रवास खडतर असला तरी प्रत्येक अडचणीने मला घडवले." ते पुढे म्हणाले,मी परदेशातून शिक्षण घेऊन पुन्हा माय भूमीत येणार आहे आणि इथल्या विद्यार्थ्यांसाठी कार्य करणार आहे. माझा संदेश इतकाच - साधनं नसली तरी स्वप्नं मोठी ठेवा, मेहनतीनं जग जिंका! "विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे विचार :सचिव अभय चव्हाण यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले, मोठं स्वप्न पाहाताआत्मविश्वास, शिस्त आणि मेहनतीने तुम्हीही यशाचं शिखर गाठू शकता."कार्यक्रमात मान्यवरांची उपस्थिती :कार्यक्रमात ह. भ. प. केशव महाराज बुधवत यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबर संस्कारांचे महत्त्व सांगितले. या शिवाय दीपक गुलमोहर, एकनाथ बुरुकुल, बबनराव बनकर, संदीप बनकर, संजय तिडके, नरेंद्र नागरे, जाकीर भाई, विष्णु जोरावर, पवन बनकर, घोडके मामा, छत्रगुण राठोड, प्राचार्य आर.बी. राठोड, पत्रकार संघाचे अध्यक्ष कृष्णा पंधे, पत्रकार रमेश खंडागळे, ब्रह्मानंद वाकोडे यांच्यासह शिक्षक, पत्रकार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी एकनाथ वाघ यांचे वडील भगवानराव वाघ यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या संघर्षमय जीवनाचा आणि मुलाच्या घडण्यातल्या योगदानाचा यथोचित गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन खंदारे सर यांनी केले. हा सत्कार समारंभ केवळ एक गौरव नव्हता, तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी आदर्श ठरला.

# श्रीरामतांडा झेडपी शाळेकडे विद्यार्थ्यांचा ओढा 141 पैकी बाहेर गावाहून ये जा करतात 130 विद्यार्थी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शुद्धोधन खंदारे.**





मंठा : सध्या पालकांचा इंग्रजी माध्यमांच्या शाळाकडे वाढत चाललेला कल यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या सातत्याने कमी होत चाललेली दिसत आहे.असे असताना याला मंठा तालुक्यातील श्रीरामतांडा या छोट्याशा तांड्यावरील जिल्हा परिषदेची मराठी माध्यमाची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा श्रीरामतांडा ही शाळा अपवाद ठरत आहे.या शाळेची पटसंख्या सातत्याने वाढत आहे.आता सद्यस्थितीत 141 विद्यार्थी असून यात 130 विद्यार्थी दहा ते पंधरा किलोमीटर अंतराहून शिक्षण घेण्यासाठी येत आहेत.यामुळे ही जिल्हा परिषदेची शाळा इतर जिल्हा परिषदेच्या शिक्षक व शाळांसाठी आदर्शदायी ठरत आहे. जिल्हा परिषदेच्या श्रीराम तांडा शाळेत एक ते पाच वर्ग असून 141 विद्यार्थी शिक्षण घेतात. विशेष म्हणजे 141 पैकी श्रीराम तांडा गावातील अकरा विद्यार्थी असून गावातील पटसंख्येच्या बारापट विद्यार्थी आजूबाजूच्या गावातून खाजगी स्कूल बस द्वारे येजा करतात. पट संख्येत झालेल्या वाढीमुळे शिक्षक संख्या ही वाढत आहे.यावर्षी पाच शिक्षक कार्यरत आहेत.यावर्षी इयत्ता एक ते पाच वर्गामध्ये नवीन 56 प्रवेश झालेले आहेत. श्रीराम तांडा जिल्हा परिषद शाळेत कोणत्याही प्रकारच्या भौतिक सुविधा नाहीत परंतु शिक्षकां कडून चांगले शिक्षण दिले जात असल्या मुळे या शाळेत प्रवेशा साठी पालकांच्या रांगा लागतात. शाळेचे मुख्याध्यापक अविनाश लोमटे, सहशिक्षक श्रीकांत अंबुरे, सुनीता दुभळकर, अर्चना लांडगे व पूजा नागटिळक हे सातत्याने व नियमितपणे विद्यार्थ्यांच्या गुण वत्ता वाढीसाठी विविध उप क्रमांचे आयोजन करतात.शाळेत प्रत्येक विद्यार्थ्यानावर वैयक्तिक लक्ष दिले जाते. सर्व वर्गातील अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांचा स्वतंत्र गट करून दुपारच्या सुट्टीत एक ते दोन या वेळेत स्वतंत्र वर्गाचे आयोजन केले जाते.तसेच गतवर्षी शाळेचे मुख्याध्यापक श्री अविनाश लोमटे यांनी मुख्या ध्यापक पदाचा पदभार असता नाही नियमितपणे शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षांचे तयारी वर्ग घेतले त्यामुळे शाळेतील दोन विद्यार्थी नवोदय विद्यालयासाठी पात्र ठरले आहेत. तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत सात विद्यार्थी पात्र ठरून दोन विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक बनले आहेत. तसेच माननिय जिल्हा धिकारी यांच्या संकल्प नेतून महादीप हवाई सहलीसाठी घेतलेल्या जिल्हास्तरीय परीक्षेत जिल्ह्यातून प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवत निवडलेल्या 10 विद्यार्थ्यां मध्ये श्रीराम तांडा शाळेतील दोन विद्यार्थी इस्त्रो सहलीसाठी पात्र ठरले होते.तसेच मंथन सामान्य ज्ञान परीक्षेत तीन विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले गतवर्षी झालेल्या मुख्यमंत्री स्वच्छ शाळा सुंदर शाळा या स्पर्धेत श्रीराम तांडा शाळेने द्वितीय बक्षीस पटकावले. तसेच तालुकास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रथम क्रमांक तसेच जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषे मध्ये द्वितीय क्रमांक मिळ विला होता. शाळेची पटसंख्या व गुणवत्ता वाढत असल्याने मुख्या ध्यापक श्री अविनाश लोमटे, शाळेतील सर्व शिक्षक तसेच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपाध्यक्ष व सर्व सदस्य यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.










दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो, 9011509831 Title code :- MAHMAR52107 Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831
Title code :- MAHMAR52107

# सिद्धांतआश्रम प्राथमिक आश्रम शाळा वरवंड येथे भटके विमुक्त दीननिमित्त विविध उपक्रमाचे आयोजन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**







वरवंड : दिनांक 31 ऑगस्ट 2025 रविवार रोजी सिद्धांत आश्रम प्राथमिक आश्रम शाळा येथे भटके विमुक्त दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन शाळेवरील शिक्षका कडून व सर्व कर्मचारी मिळून कार्य क्रमाचे चांगले प्रकारे आयोजन करण्यात आले यामध्ये विद्यार्थ्यां साठी आरोग्य तपासणी शिबिर रक्त तपासणी शिबिर वृक्षरोपण निबंध स्पर्धा वकृत्व स्पर्धा चित्रकला स्पर्धा विविध शासकीय योजनांची माहिती बँक खाते उघडणे आधार कार्ड काढणे व दुरुस्ती करणे भटक्या विमुक्त संस्कृती वर आधारित सांस्कृतिक कार्य क्रम इत्यादी उपक्रम राबवण्यात आले संस्थापक अध्यक्ष गुरुवर्य श्री भगवान महाराज यांच्या मार्गदर्शना खाली शाळेचे मुख्याध्यापक श्री देवेंद्र पद्मने सर यांनी आयोजित केलेल्या उपक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष श्री मोहन महाराज तथा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वृक्षपूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली शाळेतील बंजारा समाजाच्या विद्यार्थिनींनी आपले पारंपरिक पेहरावात नृत्य व गीत सादर करून मान्यवरांचे स्वागत केले. यानंतर मुख्या ध्यापक श्री देवेंद्रजी पद्मने सर यांनी प्रास्ताविकात 31 ऑगस्ट भटके विमुक्त दिवस फक्त ऐतिहासिक दिन नाहीतर 31 समाजा साठी संघर्षाचा सन्मानाचा आत्म सन्मानाचा प्रतीक आहे भटक्या विमुक्त काळ राहिलेला आहे समाजा साठी प्रतीक आहे भटक्या विमुक्त समाजाचा इतिहास अत्यंत भटक्या विमुक्त समाजाने त्याकाळी बैलाच्या पाठीवर राजा महाराजा देशाला अन्नधान्य पुरवण्याचे काम केले व या विमुक्त समाज त्यावेळेस रस्ते नव्हते तर रस्त्याची पूर्ण माहिती या समाजाला होती व आजही काही ठिकाणी लभान मार्ग म्हणून ओळखल्या जातात भटके विमुक्त समाज भटक्या बोली भटके समाजाची संस्कृती अत्यंत सभ्य आणि पारंपारिक आहे अशी सखोल माहिती श्री पद्मने सर यांनी दिली त्यानंतर मेहकर पंचायत समितीचे प्रमुख अतिथी माजी उपसभापती नारायणजी राठोड बोलताना म्हणाले की भटके विमुक्त दिन दरवर्षी 31 ऑगस्ट रोजी साजरा करण्याचा शासनाचा निर्णय स्वागतार्य आहे कारण याच दिवशी 1952 मध्ये भारत सरकारने ब्रिटिश कालीन 1871 गुन्हेगार जमाती कायदा क्रूर काळा कायदा रद्द केला होता ज्यामुळे या समुदायाला गुन्हेगारी जमात म्हणून समजले जात होते आणि त्यातून मुक्तता मिळाली होती ब्रिटिशाचे जुलमी राज्य उलटून टाकण्या साठी अन्य समाजाप्रमाणे भटके विमुक्त समाज सुद्धा यात आग्रही होता आपल्याजवळ असलेल्या ज्ञान कौशल्य व क्षमतेचा उपयोग या समाजाने ब्रिटिशांना हाकलून लावण्यासाठी केला हा दिवस भटके विमुक्त जातीच्या समाजाला सन्मान दिवस देण्यासाठी आणि सरकारच्या विविध योजना व उपक्रम सुविधा त्यांच्यापर्यंत पोहोचण्या साठी व भटक्या विमुक्त जाती जमाती समुदायाच्या समस्या आणि त्यांच्या कल्याणा साठी करण्यात येणाऱ्या कामाबद्दल जागरुकता निर्माण करण्या साठी व शासनाच्या विविध योजनांची माहिती त्यांना व्हावी यासाठी साजरा करण्यात येतो यावेळी विविध स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गुण गौरव प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले तसेच सर्व विद्यार्थ्यांना रक्तगट प्रमाणपत्र बँक पासबुक एक पेड मा के नाम प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणूनह भ प श्री मोहन महाराज अध्यक्ष सिद्धांत आश्रम हे होते प्रमुख उपस्थितीश्री नारायणजी राठोड माजी उपसभापती पंचायत समिति मेहकर श्री गजानन राठोड उपसरपंच वरवंड श्री परसराम जाधव पाथर्डी डॉक्टर निमदेव साहेब वैद्यकीय अधिकारी वरवंड डॉक्टर चौधरी साहेब आरोग्य सेवक श्री प्रशांत काळे सेजल पॅथॉलॉजी जानेफळ उपस्थित होते या कार्य क्रमाचे बहारदार सूत्र संचालन श्री संदीप राठोड सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री गणेश लाड सर यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री रामदास गोळे सर श्री विनोद वानखेडे सर श्री संदीप मळगणे सर श्री प्रवीण ढवळे सर श्री विवेक कांबळे सर श्री ज्ञानेश्वर सुरडकर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी शाळेचे सर्व शिक्षा वृंद व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले यावेळी विद्यार्थी वर्ग व पालक वर्ग मोठ्या संख्येने हजर होते

# सणासुदीच्या काळात रेशनकार्डधारकांना गव्हाचे वाटप करा - जयश्री शेळके जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली मागणी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**

बुलढाणा : जिल्ह्यात खरीप हंगाम 2024-25 अंतर्गत तेरा तालुक्यांमध्ये तब्बल पाच लाख तीन हजार क्विंटल इतक्या विक्रमी प्रमाणात ज्वारीची खरेदी झाली आहे. शासन निर्णयानुसार खरेदी झालेली ज्वारी संबंधित जिल्ह्यातील रेशन कार्ड धारकांना वाटप करण्याचे निर्देश आहेत. त्यानुसार सप्टेंबर 2025 पासून जिल्ह्यातील प्राधान्य गटातील शिधा पत्रिका धारकांना प्रति व्यक्ती दोन किलो ज्वारी व तीन किलो तांदूळ तर अंत्योदय अन्न योजने तील लाभार्थ्यांना दरमहा 25 किलो तांदूळ आणि 10 किलो ज्वारीचे वाटप निश्चित करण्यात आले आहे. तथापि, बुलढाणा जिल्ह्यास दरमहा 39 हजार क्विंटल गहू व 64 हजार क्विंटल तांदळाची गरज असताना गव्हाऐवजी ज्वारीचे वाटप केल्यामुळे रेशन कार्ड धारकांना




गहू मिळणे बंद झाले आहे. गहू हा जिल्ह्या तील जनतेच्या आहाराचा मुख्य घटक असून पोळी ही दैनंदिन ताटातील अत्यावश्यक बाब आहे. गहू उपल न झाल्यास सर्वसामान्य कुटुंबांना ज्वारीच्या भाकरीवर भागवावे लागणार असून यामुळे आहारातील समतोल बिघडून गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.सध्या गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद, नवरात्री, दसरा आणि दिवाळी यांसारख्या महत्त्वाच्या सणा सुदीचा काळ सुरू झाला आहे. गहू हा प्रत्येकाच्या अन्न संस्कृतीशी निगडित असून ऐन सणासुदीच्या दिवसांत गव्हाच्या ऐवजी ज्वारीचे वाटप सुरू केल्याने जनतेच्या भावनांना धक्का पोहोचत आहे. अशा काळात गव्हाऐवजी ज्वारीचे वाटप करणे योग्य नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. म्हणूनच जिल्ह्यात गव्हाचे नियमित वाटप सुरू ठेवावे आणि ज्वारीचे वाटप करावयाचे असल्यास ते गहू व तांदळाच्या अतिरिक्त प्रमाणात करावे, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळा साहेब ठाकरे) प्रवक्ता ॲड.जयश्री शेळके यांनी निवेदना द्वारे जिल्हाधिकारी यांच्या कडे केली आहे.

# नव्या जोमाने नव्या ताकदीने पुन्हा एकजूट होण्याची गरज हीच वेळ एकत्र येण्याची - सचिन राठोड

**सेवाशक्ती टाईम्स.**
**कुलदीप बिनगे.**

परतुर : शासनाने मराठा समाजाला हैदराबाद गॅझेट च्या नोंदी नुसार जो कायदेशीर जीआर काढण्यात आला या हैदराबाद गॅझेट च्या नोंदी नुसार मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र या जीआर नुसार देण्यात येणार आहे. त्याप्रमाणे बंजारा समाजाच्या सुधा हैदराबाद गॅझेट मध्ये नोंदी आहेत आंध्रप्रदेश मध्ये बंजारा समाज हा एसटी प्रवर्गामध्ये आहे तेलंगणा या राज्यात बंजारा समाज एसटी प्रवर्गामध्ये आहे या हैदराबाद गॅझेट च्या नोंदी नुसार बंजारा समाज हा सुद्धा एसटी प्रवर्गामध्ये समाविष्ट करता येतो म्हणून ज्याप्रमाणे मराठा समाज यांच्यासाठी जीआर काढण्यात आले त्याप्रमाणे बंजारा समाजाचे सुद्धा डढ प्रवर्गामध्ये आहे असे जीआर काढून महाराष्ट्रामध्ये सुद्धा बंजारा समाज एसटी प्रवर्गात समाविष्ट करून घेण्यात यावे असे सचिन राठोड यांनी बोलतांना सांगितले. अन्यथा समाजाला आंदोलनासाठी प्रवृत्त करू नये असा इशारा त्यांनी दिला आहे. तसेच समाज बांधवांनी नव्या जोमाने नव्या ताकदीने एकजूट दाखवून देण्याची हीच ती वेळ असल्याचेही त्यांनी महटले आहे.याबाबत पुढे बोलतांना त्यांनी



सांगितले की, आज तेलंगणा (एसटी), आंध्रप्रदेश (एस टी), कर्नाटक (एस.सी.) अशा लगतच्या राज्यांमध्ये बंजारा समाज आदिवासी प्रवर्गात समाविष्ट आहे. या सर्व राज्यांतील बंजारा समाजाशी रोटी-बेटी व्यवहार महाराष्ट्रातील बंजारा समाजाचा आजही अखंड सुरू आहे. सगेसोयरे, विवाह-संबंध आणि सांस्कृतिक नाते एकसंध असल्यामुळे एका राज्यात एसटी तर दुसऱ्या राज्यात नाही, हा भेदभाव न्याय्य ठरू शकत नाही. यासाठी बंजारा समाजाने आता आपली कंबर कसली पाहिजे. बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश व्हावा, यासाठी कायदेशीर, ऐतिहासिक आणि सामाजिक पुरावे पुरेपूर मजबूत आहेत. आता या चळवळीला समाजबांधवांनी खांद्याला खांदा लावून साथ देणे ही काळाची गरज आहे. यासाठी आपणास ठाऊक आहे की, आपण सर्व समाजबांधव समाज म्हणून एकत्र येण्याची गरज

> **- हैदराबाद गॅझेटचे ऐतिहासिक महत्त्व!**
> **हैदराबाद संस्थानच्या गॅझेटमध्ये बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश असल्याचे ठोस पुरावे उपलब्ध आहेत. ज्या पद्धतीने या गॅझेटमधील नोंदींवरून महाराष्ट्रात मराठा समाजाचा कुनबी म्हणून उल्लेख पुरावा मानला जात आहे, त्याच तत्त्वावर बंजारा समाजालाही एसटी प्रवर्गात स्थान मिळणे ही न्याय व ऐतिहासिक गरज आहे.**

> **- महाराष्ट्र विभाजनापूर्वीची वस्तुस्थिती!**
> **महाराष्ट्र राज्य निर्मितीपूर्वी बंजारा समाज हा एसटी प्रवर्गात नोंदवला गेला होता. पण राज्य पुनर्रचनेनंतर या समाजाला वंचित ठेवण्यात आले. हा ऐतिहासिक अन्याय दुरुस्त करून महाराष्ट्रातील सर्व बंजारा समाजाला एसटीचा लाभ मिळाला पाहिजे.**

सध्या आहे. वेगवेगळ्या संघटना, वेगवेगळे विचार परंतु आपल्या न्याय हक्कासाठी पुन्हा एकदा नव्या जोमाने नव्या ताकदीने एकजूट होण्याची गरज आहे. आपण एकत्र आलो तर निश्चितपणे आपल्याला न्याय मिळाल्या शिवाय राहणार नाही त्यासाठी सर्व समाज बांधवांनी एकत्र यावे असे आवाहन अर्जुन नायक (राठोड) यांनी केले.आज इतिहास आपल्याला एक सुवर्णसंधी देत आहे. बंजारा समाजाचे हक्काचे स्थान पुन्हा मिळवण्यासाठी, पुढील पिढ्यांना न्याय देण्यासाठी आणि समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रत्येक समाजबांधवाने या आंदोलनात सहभागी व्हावे. आपल्या न्याय्य हक्कासाठी, भावी पिढ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पुन्हा एकदा पांढरे वादळ हे महाराष्ट्रात घोंगावणार असुन बंजारा समाजाने आंदोलन उभे करण्यात येणार आहे. वेगवेगळ्या संघटना, वेगवेगळे विचार असले तरी एकत्र येण्याची वेळ आली आहे. आपल्या एकतेच्या बळावर आपण हा न्याय मिळवू आणि बंजारा समाजाला पुन्हा त्याचे खरे स्थान मिळवून देऊ शकतो असेही सचिन राठोड यांनी महटले आहे.

# दिवा विकास प्रतिष्ठानचे शैलेश पाटील यांनी घेतले शेकडो गणरायांचे दर्शन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अमित जाधव.**

ठाणे : दिव्यातील गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. ढोल-ताशांचा गजर, रंगीबेरंगी सजावट आणि बाप्पाच्या दर्शना साठी लागलेल्या रांगा यांनी दिवा शहराला उत्सवाचा रंग चढू लागला आहे. सदर भक्तीमय वाताव रणात दिवा विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष, मा. नगरसेवक व उपशहर प्रमुख शैलेश पाटील व कार्यकर्ते शहरातील अनेक घरगुती व गणेश मंडळाना भेटी देत गणरायाचे दर्शन घेत आहे.भक्तांसोबत गप्पा मारणे, मंडळ कार्यकर्त्यांशी मैत्रीपूर्ण संबंध जोडणे हे आपले कर्तव्य असून दरवर्षी प्रमाणे यंदा ही दिव्यातील सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्या



घरी श्रीगणेशाचे दर्शन घेऊन मन प्रसन्न होते अशीच गणरायाची कृपा आशीर्वाद आमच्यावर राहो तसेच सर्वजनिक गणेश उत्सव मंडळाना भेटी देऊन दिव्यातही युवा वर्गासाठी रोजगाराच्या संधी उपल व्हाव्यात, कामगार वर्ग व उद्योग क्षेत्राच्या इच्छा आकांशा पूर्ण व्हाव्यात, महिला, भगिनीं देखील अनेक क्षेत्रात आपले नाव वाढवावे अशी मनोकामना श्री च्या चरणी करत आशीर्वाद घेतले असे शैलेश पाटील यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

# अतिवृष्टीचा तडाखा - लोणीकर साहेबांच्या पुढाकाराने तात्काळ प्रशासनाचा हस्तक्षेप

**सेवाशक्ती टाईम्स.**
**कुलदीप बिनगे.**

परतुर : परतूर शहरातील राजपूत गल्ली येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे रवी सुभाषसिंग चुंगडे यांचे घर कोसळून मोठे नुकसान झाले. या घटनेची माहिती मिळताच मा. आमदार बबनराव लोणीकर साहेब व भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव राहुल भैया लोणीकर यांच्याशी संपर्क साधण्यात आला. त्यांनी परिस्थितीची गंभीर दखल घेत तात्काळ प्रशासनाला आदेश देऊन संबंधित अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाठविले. त्यांच्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे पंचनामा व शासकीय प्रक्रिया विलंब न होता सुरु झाली.या दुर्घटनेनंतर भाजप शहराध्यक्ष प्रवीण सातोनकर, नगरसेवक प्रकाश चव्हाण व नगरसेवक कृष्णा आरगडे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यांनी बाधित कुटुंबाला धीर देत सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. यावेळी तलाठी राऊत साहेब यांना पंचनामा



करण्यास लावण्यात आले. शहरा ध्यक्ष प्रवीण सातोनकर म्हणाले की, "नागरिकांवर आलेल्या संकटाच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहणे ही आमची जबाबदारी आहे. शासनस्तरावरून मदत मिळवून देण्यासाठी आम्ही सात त्याने प्रयत्न करणार आहोत." नगरसेवक प्रकाश चव्हाण व कृष्णा आरगडे यांनीही बाधित कुटुंबाशी संवाद साधून सांगितले की, "संकट कितीही मोठे असले तरी आम्ही जनतेच्या सोबत आहोत."या घटनेत लोणीकर साहेबांच्या त्वरित पुढाकारा मुळे प्रशासनाने ताबडतोब प्रतिसाद दिला. त्यामुळे नागरिकां मध्ये समाधान व्यक्त होत असून भाजप पदाधिकारी व लोक प्रतिनिधींच्या तत्परतेचे कौतुक केले आहे.

# वरणगावात डास निर्मूलनासाठी फवारणीसह धूरडीला सुरुवात भाजपाचे पदाधिकारी यांच्या प्रयत्नाला यश



**सेवाशक्ती टाईम्स.**
**अरुण धनगर.**

वरणगाव : वरणगाव शहरामध्ये डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जंतनाशक व फवारणी या मागणीसाठी भाजपाचे ज्येष्ठ पदाधिकारी यांनी वरणगाव नगर परिषदेचे ओएस यांची नुकतेच भेट घेऊन चर्चा केली. यावेळी प्रशासनाशी झालेल्या चर्चे नंतर 3 तारखे पासून वरणगाव शहरा तील सर्व भागात डास निर्मूलना साठी औषध फवारणी सुरू करण्यात येणार आहे. तर पुढील दोन दिवसात फॅंकिंग मशीन द्वारे धुरळणीही करण्यात येईल असे आश्वासन भाजपाचे पदा धिकारी यांच्या शिष्ट मंडळाला प्रशासनाने दिले होते. याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे तालुका ध्यक्ष प्रशांत भाऊ पाटील, अतुल भाऊ झांबरे, राजेश इंगळे सर, वैभव महाजन, शुभम जावळे, महेश सोनवणे, विनोद झोपे, हीप्पा भाई आदी कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. त्याच प्रमाणे शहर वासीयांनी प्रशास नाला सह कार्य करावे, तसेच स्वच्छता आणि डास निर्मूलना साठी नागरिकांनी त्यांच्या परिसरात पाणी साचू न देता दक्षता घ्यावी असेही आव्हान करण्यात आले आहे.

# आज यूथ मूव्हमेंट ऑफ महाराष्ट्र यांच्या वतीने मानवत येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**रियाज शेख.**

मानवत : ईद-ए-मिलाद उन नबी या निमित्ताने यूथ मूव्हमेंट ऑफ महाराष्ट्र यांच्या वतीने मानवत येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन दि. ५ सप्टेंबर शुक्रवार रोजी मरकज मस्जिद हॉल येथे करण्यात आले आहे.सकाळी दहा ते संध्याकाळी सहा पर्यंत हे रक्तदान कार्यक्रम होणार आहे तरी या रक्तदानात मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन जमाते इस्लामी हिंद चे नजात पठाण सर यांनी केले आहे. रक्तदान हे जीवन वाचवणारे एक महत्त्वाचे कार्य आहे, ज्यामुळे शस्त्रक्रिया,



अपघात आणि गंभीर आजारां मध्ये रुग्णांचे प्राण वाचवता येतात. एका रक्त दानातून तीन लोकांपर्यंत मदत पोहोचू शकते. रक्तदाना मुळे हृदय विकाराचा झटका आणि हृदय व रक्त वाहिन्यां संबंधी आजा रांचा धोका कमी होतो आणि लोहाची पातळी नियंत्रित राहते. रक्तदानाचे कार्य एक उदात्त कार्य मानले जाते कारण ते इतरांना जीवनदान देते आणि मिळ वणाऱ्याला मानसिक समाधान देते

# ओंकारेश्वर येथे 'बारा गाव, एक गणपती'ची परंपरा कायम रोज हजारो गणेश भक्त दर्शनाला येतात


**सेवाशक्ती टाईम्स.**
**शुध्दोधन खंदारे.**

मंठा : मंठा तालुक्यातील देवगाव खवणे येथील ओंकारेश्वर संस्थान येथे गेल्या १४ वर्षापासून "बारा गाव, एक गणपती" ही प्रेरणादायी संकल्पना राबवली जात आहे. महंत भागवतगिरी महाराज आणि महंत बालकगिरी महाराज मार्गदर्शना खाली यांच्या हा जहागीर, उपक्रम सुरू असून, यंदाचे वर्ष हे १४ वे वर्ष आहे. देवगाव खवणे, अंभोरा वैद्यवडगाव, गणेशपूर, वाघोडा, वरूड, माहोरा, नायगाव वस्ती, पळसखेडा, टकले पोखरी, पांढुर्णा आणि ब्रह्मवडगाव ही बारा गावे एकत्र येऊन सामूहिक गणेशोत्सव साजरा करतात. ही संकल्पना 14 वर्षापासून बारा गाव एक गणपतीही संकल्पना सुरू आहेया उपक्रमाचे मंठा पोलिस निरीक्षक मनोज कुमार राठोड कौतुक करत, महाराष्ट्रातील इतर



गावांनीही याचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले आहे. या काळात कीर्तन, महाप्रसाद, आरोग्य शिबिरे, जनजागृती उपक्रम, विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन, कृषिविषयक चर्चासत्र आदी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. सततच्या पावसामुळे ओंका रेश्वर वॉटरप्रूफ आश्रमात मंडप उभारण्यात आला आहे. नागरिकां साठी उपसभापती किसनराव मोरे व महादेव बाहेकर यांच्या पुढाका रातून वाहनसेवा उपल करून दिली आहे. "आपला गणपती, आपली जबाबदारी" या भावनेने एकोपा, श्रद्धा व सामाजिक समर्पण जोपासत हा गणेशोत्सव साजरा होत असून, इतरांसाठी तो एक आदर्श ठरत आहे.

# बुलढाण्यात "श्री संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजना" आढावा बैठक संपन्न

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अंकोश राठोड.**

बुलढाणा : ४ सप्टेंबर २०२५:श्री संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजना" अंतर्गत जिल्हा स्तरीय समितीची महत्व पूर्ण बैठक आज जिल्हा धिकारी कार्यालय, बुलढाणा येथे जिल्हाधिकारी मा. डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री गुलाबराव खरात (सहअध्यक्ष), तसेच अशासकीय सदस्य मा. डॉ. प्रशांतजी राठोड आणि श्री दीपक साबळे उपस्थित होते.बैठकीत योजनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट निर्देश दिले की, स्वतंत्र ग्राम पंचायत, गट ग्रामपंचायत व महसुली दर्जासाठी पात्र असलेल्या तांड्यांचे प्रस्ताव तातडीने पाठवावेत, अन्यथा दिरंगाई करणाऱ्या अधिका ऱ्यांवर कार्यवाही केली जाईल.तसेच, प्रत्येक तांड्यावर सर्व महसुली सेवा घरपोच देण्यासाठी ठोस आणि कालबद्ध नियोजन करावे, अशा सूचनाही सर्व संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. यापूर्वी सदर योजनेमधून झालेल्या विकास कामांचे देखील गुणात्मक दर्जाचे मूल्यांकन सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार करण्यात येईल असे आश्वासित करण्यात आले. शासन हे तांडा वाड्याच्या सर्वांगीण विकासा साठी कटिबद्ध असून, समाजाच्या प्रगतीसाठी सर्व तोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासनही जिल्हा धिकाऱ्यांनी यावेळी दिले.

# १०० रुपयांच्या स्टॅम्पवर फेरफार मंजूर : महसूल अधिकाऱ्यांवर गंभीर आरो

## पतलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांच्या कारभाराची चौकशी करण्याची मागणी

## शासनाचा ₹1.90 लाख महसूल बुडाल्याचा आरोप

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**

जिंतूर : मौजे बोरी (ता. जिंतूर) येथील गट क्र. २५४ मधील फेरफार अवघ्या १०० रुपयांच्या बाँड पेपरवर मंजूर करून संबंधित महसूल अधिकाऱ्यांनी शासनाचा तब्बल ₹1.90 लाखांहून अधिक महसूल बुडविल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी तलाठी रामेश्वर शिंदे आणि मंडळ अधिकारी गंगाप्रसाद साखरे यांच्यावर पदाचा गैरवापर केल्याचा आरोप असून, चौकशी करून कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.वरूड नृसिंह (ता. जिंतूर) येथील शरद चव्हाण यांनी तहसीलदार, जिंतूर यांच्याकडे दिलेल्या लेखी तक्रारीत हा प्रकार उघड केला आहे. त्यांनी ही तक्रार महसूल मंत्री, जिल्हाधिकारी (परभणी) आणि उपविभागीय अधिकारी (सेलू) यांच्याकडेही पाठवली आहे.

**- ठळक मुद्दे -**

**- मौजे बोरी (ता. जिंतूर) येथील गट क्र. २५४ मध्ये १०० रुपयांच्या स्टॅम्पवर फेरफार मंजूर.**

**- नियमानुसार किमान ₹200 मुद्रांक शुल्क अनिवार्य.**

**- नातेसंबंध नसल्यास लाखो रुपयांचे नोंदणी व मुद्रांक शुल्क अपेक्षित. शासनाचा अंदाजे ₹1.90 लाख महसूल बुडाल्याचा आरोप.**

**- तलाठी शिंदे व मंडळ अधिकारी साखरे यांच्यावर कारवाईची मागणी.महसूल मंत्री, जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकाऱ्यांकडे तक्रारीची प्रत सादर.**

**- नियमांना तिलांजली ? -**

**तक्रारीनुसार, अशा प्रकारच्या फेरफारासाठी नियमानुसार किमान ₹200 चे मुद्रांक शुल्क आकारणे बंधनकारक आहे. शिवाय, देणारा व घेणारा हे नातेसंबंधात येत नसल्यास अशा व्यवहारासाठी नोंदणी व मुद्रांक शुल्क मिळून लाखो रुपयांची रक्कम आकारली जाणे अपेक्षित असते. मात्र, केवळ ₹100 च्या स्टॅम्पवर फेरफार मंजूर करण्यात आला असून, महसूल विभागाच्या नियमांची सर्रास पायमल्ली करण्यात आली आहे.तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांवर आरोपतलाठी रामेश्वर शिंदे आणि मंडळ अधिकारी गंगाप्रसाद साखरे यांनी पदाचा गैरवापर करून शासन महसूल बुडविल्याचा आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.**

# ओम गणेश मंडळाचा "भुकेलेल्याना अन्न द्या" संदेश !

**सेवाशक्ती टाईम्स.**
**श्याम राठोड.**




**16 वर्षापासून डीजे न वाजवण्याचा संकल्प!**

**गणेशोत्सव म्हटले की अबाल वृद्धांच्या आनंदाला उधाण येतो. सर्वत्र आनंदाचे व भक्तिमय वातावरण निर्माण होते दहा दिवस बाप्पांची पूजा अर्चना भजन कीर्तन तसेच विविध उपक्रम अनेक जण राबवत असतं परंतु अनंत चतुर्थी म्हणजे बाप्पाचा विसर्जनाचा दिवस या दिवशी कर्कश्य आवाजाचे मोठ मोठे डीजे लावून मिरवणूक काढली जाते त्यामुळे वयोवृत्तांना व लहान बालकांना मोठा त्रास सहन करावा लागतो डीजेच्या होणाऱ्या विपरीत परिणाम लक्षात घेता ओम गणेश मंडळ मागील 16 वर्षापासून डीजे विरहित गणेश उत्सव साजरा करतो आहे त्यामुळे सर्वत्र मंडळाचे कौतुक केले जात आहे.**

दारव्हा : गणेशोत्सवातून सामाजिक उपक्रम राबविण्याची परंपरा कायम राखत दारव्हा येथील ओम गणेश मंडळाने "भुकेलेल्याना अन्न द्या '' असा संदेश देत आगळा वेगळा आदर्श निर्माण केला.जगात हजारो टन अन्नाची नासाडी होते, परंतु अनेक बेघर, अनाथांच्या नशीबी एक वेळचे जेवण सुद्धा नशीबी नाही. समाजातील प्रत्येक वंचित घटकाला पोटभर अन्न मिळावे या अनुषंगाने जनजागृती व्हावी हा उद्देश ठेवून कर्मयोगी संत गाडगे महाराजांच्या दशसूत्री मधील' भुकेलेल्यांना अन्न द्या' या संकल्पने वर आधारीत या वर्षी अंबिका नगर येथील ओम गणेश मंडळ यांनी भावस्पर्शी देखावा सादर केला आहे.गणेशोत्सव दरम्यान श्री गणपती बाप्पाच्या साक्षीने काही दानशूर व्यक्तींनी स्वकीयांचा वाढदिवस तसेच आनंदाचा क्षण अन्नदान करून साजरा करण्याचा संकल्प केला. तसेच ओम गणेश मंडळाने अन्नछत्राचा उपक्रम राबवित बेघर गरजू लोकांना अन्नदान केले. ओम गणेश मंडळाने अन्न पुरवठा निरीक्षक तुषार राठोड यांचे हस्ते पर्यावरण पूरक मूर्तीची स्थापना केली. विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून परिसरात स्वच्छता व कचरा विलगीकरण बाबत प्रसार करीत आहे. नगर परिषदेच्या माझी वसुंधरा उपक्रम अंतर्गत नागरिकांना स्वच्छतेची शपथ देऊन सहभाग नोंदविला. पर्यावरण पूरक संदेश देणाऱ्या चित्रकला स्पर्धेचे देखील आयोजन करण्यात आले. वृक्षारोपण तसेच सीड बॉलचा उपक्रम राबविण्यात येत आहे. रात्री भजनाचा कार्यक्रम पार पाडला जातो. श्री गणेश विसर्जन मिरवणूक पारंपरिक वाद्य डफडीच्या तालावर संपन्न होणार असल्याचे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. श्री गणेश महोत्सवाच्या यशस्विते साठी मंडळाचे अध्यक्ष जिवन काळे, उपाध्यक्ष संदिप शिले, सचिव स्वप्नील राठोड, प्रविण राऊत, विलास शिले, किशोर राऊत, अमोल ठोंबरे, रुषिकेश गोटे, निखील मडसे, अमोल राठोड, महेश दंडे, कार्तिक शिले, राजेश पराळे, हर्ष चव्हाण विधी सल्लागार ॲड. नितीन जवके, ॲड. सचिन गोरले मार्गदर्शक सुनिलभाऊ आरेकर परिश्रम घेत आहेत.

# सकल ओबीसीचा तहसील कार्यालयावर मोर्चा

## ओबीसी आरक्षणावर गदा आणणारा अध्यादेश रद्द करण्याची मागणी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**सुनिल आडे.**





मालेगाव : मालेगाव तालुक्यातील सकल ओबीसी समाज बांधवांच्या वतीने आज ता 4 रोजी तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला यावेळी तहसील दाराना निवेदन देऊन ओबीसी आरक्षणा वर गदा आणणारा ता 1 सप्टेंबर रोजीचा अध्यादेश रद्द करण्याची मागणी केली आहे निवेदनात म्हटले आहे की दि ०१ सप्टेंबर २०२५ रोजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून शासन निर्णय क्र. सबीसी – २०२५/ प्र. क्र. २१९ / माक जारी करण्यात आला आहे. या निर्णयानुसार मराठा समाजा तील काही व्यक्तींना मराठा–कुणबी समा जाशी जोडून ओबीसी प्रमाण पत्र मिळवून देण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे.हा शासन निर्णय पूर्णपणे अन्याय कारक, बेकाय देशीर व असंवैधानिक आहे. या निर्णयामुळे ओबीसी समाजातील सुमारे ४०० हून अधिक जातींच्या हक्कां वर गदा येणार असून, त्यांना शिक्षण व नोकरीच्या क्षेत्रात होणारे प्रतिनिधित्व गंभीर स्वरूपात घटणार आहे. त्यामुळे हा अध्यादेश रद्द करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे शिरपूर परिसरातील ओ बी सी बांधव मोटार सायकल रॅली ने मालेगाव शहरातील जुने बस स्थानकावर पोहोचले. तेथून रॅली कृषी उत्पन्न बाजार समिती जवळ आली तेथून मोर्चा तहसील कार्यालयात पोहोचला तिथे तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. यावेळी उपस्थितना जी प सदस्य डॉ शाम गाभणे, समता परिषदेचे प्रदेश चिटणीस प्रा अरविंद गाभणे, शिवसेना (उबाठा )उप जिल्हा प्रमुख अशोकराव अंभोरे ॲड संदीप ताजने, कलीमभाई रेघीवाले, नंदकिशोर गोरे, सेवाराम आडे, नंदकिशोर उल्हामाले यांनी हा अध्यादेश रद्द करण्याची गरज विषद केली कार्यक्रमाचे संचालन डॉ विजय उल्हामाले यांनी केले माजी जी प सदस्य मो.इमदादभाई डॉ आशिष वाघमारे, संतोष भालेराव अमित वाघमारे गजानन गाभणे अरुण बोबडे कैलास राऊत, रमेश इरतकर माजी प स सदस्य लक्ष्मण भांदुर्गे संतोष बाविसकर, दीपक काळे, सतीश शेंडे दिलीप विश्वंभर, समता परिषदेचे तालुका अध्यक्ष जावेद भवानी वाले, कपिल भालेराव, सुनील आडे, ॲड सुभाषराव घुगे, वसंतराव लव्हाळे, चंद्रकांत गायकवाड, डॉ अशोक राव घुगे आदी उपस्थित होते.

# जिंतूरात ऐन गणेशोत्सवात विजेचा लपंडाव!

## गणेश मंडळांचा संताप, नागरिक त्रस्त – महावितरणला धारेवर धरले

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**



जिंतूर : शहरात गणरायाचे आगमन होताच ३२ पेक्षा अधिक गणेश मंडळांनी आकर्षक मंडपात श्रींची प्रतिष्ठापना केली. ढोल–ताशांचा गजर, आरत्या, सांस्कृतिक कार्यक्रमांनी भक्तिभावाचे वातावरण रंगले असतानाच महा वितरणच्या निष्का ळजी पणामुळे गणेशोत्सवात अंधार पसरला. वारंवार वीज खंडित होत असल्याने मंडळांचे नियोजन विस्कळीत होत असून नागरिक त्रस्त झाले आहेत. नगेल्या काही दिवसां पासून दिवस–रात्र लाईट लपंडाव खेळत आहे. ऐनवेळी वीज गायब होत असल्याने आरती, भजन, ढोल–ताशा, नृत्यस्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम यावर पाणी फिरत आहे. नागरिक व गणेश मंडळांनी व्यक्त केलेल्या नाराजीचा सूर अधिक चढला आहे. महावितरणकडून पूर्वी "गणेशोत्सव काळात वीज पुरवठा खंडित होणार नाही" अशी ग्वाही देण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात दररोज अनेकदा वीज खंडित होत असल्याने ही ग्वाही फोल ठरत असल्याचे चित्र आहे. शहरातील प्रमुख चौकातील रोषणाई थंडावल्याने सजावटीची शोभा मलिन झाली आहे. शहर गणेशोत्सव मंडळ व नागरिकांनी "गणरायासमोर आरती सुरू असताना वीज जाणे म्हणजे भाविकांचा अपमान आहे. महावितरणने तत्काळ नियोजन करून अखंडित वीजपुरवठा करावा, अन्यथा आंदोलनाशिवाय पर्याय राहणार नाही" असा इशारा दिला आहे. शांतता समितीच्या बैठकीत देखील हा मुद्दा प्रखरपणे मांडण्यात आला. "गणेशोत्सव हा आनंदोत्सव असून अशा काळात वीजपुरवठा खंडित झाल्यास उत्सवाची शोभा कमी होते. महावितरणने जबाबदारी स्वीकारून कायम स्वरूपी उपाययोजना कराव्यात" अशी मागणी नागरिकांनी केली.

# रोगनिदान शिबिरात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

## समता गणेश मंडळाचा उपक्रम गावोगावी कौतुकाचा विषय




**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**

जिंतूर : तालुक्यातील चारठाणा येथे समता गणेश मंडळाने आयोजित केलेल्या भव्य रोग निदान शिबिराला गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गुरुवारी (दि.४) भर विण्यात आलेल्या या शिबिरात तब्बल २०० हून अधिक नागरिकांनी हजेरी लावून आरोग्य तपासणी करून घेतली. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी रा.का. तालुका अध्यक्ष लक्ष्मण बुधवंत होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून गजानन वह्राड, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील अंधारे, अजित पवार गटाचे नानासाहेब राऊत, मिनाताई राऊत, अन्नासाहेब राऊत, डॉ. रामेश्वर दुधाटे, डॉ. मनीषा तोडकर, डॉ. शशांक मगर, डॉ. सतीश शेंगुळे, डॉ. यश कोलते, डॉ. चेतन बोरसे तसेच साक्षी क्षिरसागर आदी मान्यवर उपस्थित होते.शिबिर यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष तुषार तोडकर, उपाध्यक्ष निखिल राऊत, राहुल राऊत, गौरव तायशेटे, योगेश तमशेटे, राम किसन मस्के, दत्ता कटारे, संतोष कटारे, कालिदास पांचाळ, संदीप पांचाळ, मंतया स्वामी, अंकुश लांडगे, राम कटारे, जगन्नाथ केदारी, श्याम नवलाखे, धोंडिराम थिटे, सुधाकर क्षिरसागर, भिमराव कटारे, पिंटू क्षिरसागर, शंकर कटारे, गणेश राऊत, भागवत वानखरे, विलास भुते, अनिल करसकर, तहेसिन देशमुख, आसा राम घाटुळ, शिवहार मस्के, सचिन घाटुळ, रितेश देशमुख, रोहन देशमुख, मनोज गवारे, बाळा साहेब मस्के यांच्यासह समता गणेश मंडळ, आदर्श गणेश मंडळ, बसवेश्वर गणेश मंडळ, माऊली गणेश मंडळ व वीर हनुमान गणेश मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने झटले. आरोग्य तपासणी बरोबरच रोग प्रतिबंधक जन जागृतीही करण्यात आली. ग्राम स्थांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत करून समता गणेश मंडळाच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले.

# अकोला जिल्हा समता परिषदेचच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भारत चव्हाण.**



सारकिन्ही : जिल्हा समता परिषदेच्या वतीनेजिल्ह्यातील समता परिषदेच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने अकोला जिल्हा अधिकारी यांना निवेदन देऊन ओबीसींच्या आरक्षणा संदर्भात चर्चा केली याप्रसंगी अकोला जिल्हा समता परिषदेचे अध्यक्ष गजानन म्हैसणे अमरावती विभागीय संघटक गजाननराव इंगळे माजी आमदार बळीराम सिरस्कार माजी आमदार हरिभाऊ भदे माजी आमदार नारायणराव गव्हाणकर माजी आमदा ज्ञान देवरावर ठाकरे जि प माजी अध्यक्ष संगीता आढाव माया इरतकार प्रकाश बिरकड जिल्हा विजय कौसल शत्रुघ्न बिरकड श्रीराम पालकर समता परिषद शहराध्यक्ष राम जोगतोळे समता परिषदेचे उपाध्यक्ष विनोद मिरगे गजानन भारताचे विजय गाडगे1 सदाशिव शेळके अशोका1 बोळे शंकर काकड दामोदर हागे मधुकर देवकर चक्र चक्रधर राऊत गजानन वाघमारे महा देवराव साळवेसुभाष भाड किशोर रौंदळे मुकेश इंगळे सुनील डाकोलकर सुरेश बोचरे किशोर सोनवणे सुनील उंबरकर नंदकिशोर बहादुरे अंकुश राऊत एडवोकेट प्रकाश दाते गणेशराव काळपांडे जगदीश तायडे नरेंद्र खवले संतोष बिलबिले दीपक गोलडे भास्कर राऊत अशोक भराड समता परिषदेचे जिल्ह्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने प्रसंगी उपस्थित होते.

# श्री क्षेत्र वालसा वडाळा येथे जिल्हा परिषद सदस्य आशाताई पांडे यांच्या हस्ते गणपती बाप्पा ची आरती संपन्न




**सेवाशक्ती टाईम्स.**
**दिपक जैस्वाल.**

भोकरदन : भोकरदन तालुक्यातील श्री क्षेत्र वालसा वडाळा येथे आज दिनांक ०३ / ०९ / २०२५ रोजी सकाळी ८ वाजता सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांनी जिल्हा परिषद सदस्या सौ आशाताई पांडे यांचा मनिषा तोंडे यांनी सत्कार केला व आशाताई पांडे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी उपस्थित ज्योती बाई रमेश पोटे, मंदाबाई सदानंद आसरे,द्वारकाबाई किरण पोटे, दादाराव भाऊ राऊत माजी सरपंच, डिगांबर कतोरे सरपंच, भागवत पोटे अध्यक्ष, सुभाष तेलंग्रे, रतीलाल फुसे, समाधान पी. राऊत, रमेश पोटे, पी. के. पोटे, किरण पोटे, मिलिंद कुलकर्णी, धीरज तेलंग्रे होटलवाले, दिपक तेलंग्रे, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ चे सर्व पदाधिकारी यावेळी हे उपस्थित होते. व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ तर्फे सायंकाळी ४ वाजता महाप्रसादाचे आयोजन केले आहे, गावातील नवतरुण मंडळी यांनी विशेष परिश्रम घेतले.